

# 'श्री निकेतन'ला नॅकची 'बी' श्रेणी

नागपूर : श्री निकेतन बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज येथे नॅक कमिटीने नुकतीच भेट दिली. समितीद्वारे महाविद्यालयाची सर्वांगीण तपासणी करून मूल्यांकन करण्यात आले. या तपासणीच्या आधारे कॉलेजला 'बी' श्रेणी मिळाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद गंधे, संस्थेचे सचिव प्रसाद गंधे, प्राचार्या डॉ. श्रीबाला देशपांडे तसेच महाविद्यालयातील आयक्यूएसीचे सदस्य डॉ. ए. एच. वानखेडे यांनी महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांनी केलेल्या कार्याची प्रशंसा केली.

Scanned with CamScanner

# श्री निकेतनमध्ये स्नेहसंमेलन



नागपूर : श्री निकेतन आर्ट्स व कॉमर्स कॉलेज येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या डॉ. श्रीबाला देशपांडे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. शिक्षक आमदार नागो गाणार समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तर श्री निकेतन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रवींद्र बिजवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संस्थेच्या उपाध्यक्षा अनुराधा गंधे, कार्याध्यक्ष अरविंद पथे, सह सचिव प्रसाद गंधे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. मानवी जीवनाच्या चेहऱ्याचे प्रकटीकरण शिक्षणातून झाले पाहिजे, असे मत गाणार यांनी व्यक्त केले. इतर मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे संचालन प्रा. विजय पाठक यांनी केले. संचालन डॉ. राजेंद्र मालोकर तर सारिका पाटील आभार मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

ed with CamScanner

www.tarunbharat.net
तरुण भारत
बुधवार, २२ जानेवारी २०२० ‹‹ 3

# निकेतन महाविद्यालयात गंधे यांचा स्मृतिदिन



श्री निकेतन महाविद्यालयात मराठा सरदार अंताजी माणकेश्वर गंधे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षस्थानी अरुण पाथ्रडकर तर प्रमुख अतिथी म्हणून आ. प्रा. अनिल सोले, रवींद्र बिजवे, श्रीपाद गंधे, अनुराधा गंधे, सुनंदा गंधे, वानखेडे, प्रसाद गंधे व प्राचार्य डॉ. एस. व्ही. देशपांडे उपस्थित होते. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. उज्ज्वला गोंडाणे यांनी अंताजी माणकेश्वर गंधे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. राजेंद्र मालोकर व प्रा. कांचन जोशी यांनी केले. आभार प्रा. प्रशांत खळतकर यांनी मानले.

Scanned with CamScanner

The Hitavada 8
NAGPUR ■ Saturday ■ October 26 ■ 2019

# Shri Niketan Kala-Vanijya Mahavidyalaya



College authorities along with women and guest at the event.

'CERVICAL Cancer Awareness Programme' was organised at Shri Parshvnath Digambar Khandelwal Jain Temple Trust Sabhagruh, Juni Shukravari by Commerce and English Department of Shri Niketan Kala-Vanijya Mahavidyalaya. Dr Pragati Khalatkar, Gynaecologists was the chief guest of the event while Dr Shribala Deshpande, Principal presided over the event. The women from nearby areas were present on the occasion. The Co-ordinator of the programme Dr Bharti Sudarshan Goswami made the introductory remarks. Kanchan Joshi, AssistantProfessor compered the event while a vote of thanks was proposed by Dr Rekha Gulhane, Assistant Professor. All staff members made efforts for success of the programme.

Scanned with CamScanner

तरुण भारत
नागपूर, रविवार, २७ जून २०२१


# श्री निकेतन महाविद्यालयात वाचन दिवस



श्री निकेतन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाद्वारे केरळमधील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते पी. एन. पणीक्कर यांचा स्मृतिदिन वाचन दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त आभासी पद्धतीने कोरोना लसीकरण जनजागृती अभियान, बुकटॉक, कविता वाचन आदी स्पर्धा घेण्यात आल्या. कथाकथन ही स्पर्धा पिरॅमिड सिटी, बेसा येथील सोसायटीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर. जी. मालोकर यांचे मार्गदर्शन लाभले. संचालन सोनुकुमार शर्मा यांनी केले. आभार सारिका पाटील यांनी मानले.

Scanned with CamScanner

www.tarunbharat.net
तरुण भारत
नागपूर, बुधवार, २३ जून २०२१

# श्री निकेतन महाविद्यालयात योग दिन



श्री निकेतन महाविद्यालय येथे शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. प्रशांत खळतकर व प्रा. विजय पाठक उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी योगदिनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. मुरलीधर गवळी यांनी केले. आभार प्रा. विजय पाठक यांनी मानले. यशस्वितेसाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

Scanned with CamScanner

दैनिक भास्कर

## न्यूज इनबॉक्स




# उन्नत भारत अभियान के लिए पांच गांवों का चयन

नागपुर| स्थानीय श्री निकेतन आर्टस् कॉमर्स कॉलेज ने कलमेश्वर स्थित मांडवी , पिल्कापार, खुमारी, तेलकामठी एवं नांदीखेड़ा इन गांवों का चयन कर उन्नत भारत अभियान में भागीदार बना। इन गांवों के विकास के लिए हर जरूरी कदम उठाया जा सके, इसलिए सहयोगी प्राध्यापक डॉ. भारती गोस्वामी तथा पी.आय. समन्वयक उन्नत भारत अभियान ने महाविद्यालय के छात्र-छात्राओं को गांवों के विकास से संबंधित आर्थिक, सामाजिक आदि मुद्दों का निरीक्षण करने के लिए इन गांवों को भेंट दी। अभियान के अंतर्गत महाविद्यालय की प्राचार्य डॉ. श्रीबाल देशपांडे ने तेलकामठी ग्रामपंचायत के सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामवासी आदि को अभियान का उद्देश्य बताया। अभियान में प्रा. विजय पाठक, डॉ. कांचन जोशी का सहयोग मिला।

Scanned with CamScanner

# ग्रीन क्लबच्या वतीने श्री निकेतनमध्ये वृक्षारोपण



नागपूर : रेशीमबाग येथील श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालयामध्ये ग्रंथालयाच्या वतीने ग्रीन क्लबअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. गणेशनगर एनआयटी पटांगणावर हा उपक्रम पार पडला. महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्य डॉ. रेखा गुल्हाने यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला एनआयटी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. वृक्षरोपणानंतर विद्यार्थ्यांना रोपट्यांचे पालक त्व देण्यात आले. प्रभाग क्रमांक२८ (ड)चे नगरसेवक पिंटू झलके यांनी रोपटी उपलब्ध करून दिली. ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथपाल सारिका पाटील यांनी हे आयोजन केले होते. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

www.tarunbharat.net
तरुण भारत
गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९ « ५

# श्री निकेतन महाविद्यालयात शिक्षक दिन



श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालयात शिक्षक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्या डॉ. रेखा गुल्हाने तर प्रमुख अतिथी म्हणून सांस्कृतिक विभाग ग्रंथपाल सारिका पाटील उपस्थित होत्या. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संचालन प्रणाली चिचघरे यांनी तर आभार शादमानी खान हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन वर्ग आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner

# वाचन प्रेरणा दिन उत्साहात

## श्री निकेतन, विमेन्स कॉलेजचा उपक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज आणि विमेंस कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स नागपूर येथील ग्रंथालय व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर व डॉ.एन.आर. दीक्षित यांच्या मार्गदर्शनात डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जयंतीदिनी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने त्रिदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचन अभिरूची वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने दैनिक लोकसत्ताचे वरिष्ठ उपसंपादक शफी पठाण यांचे 'वाचन संस्कृती व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. दुसऱ्या दिवशी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्राध्यापक गवळी, डॉ. तुळसकर, प्रा. अर्चना खडसे यांनी जबाबदारी सांभाळली. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. मालोकर यांनी केले. तिसऱ्या दिवशी 'आम्ही 'बी' घडलो तुम्ही



'बी' घडाना' या सदराखाली महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री निकेतन महाविद्यालयातील मंगेश पुंड, मंगेश लाडीकर, सारिका बंजारी आणि मेघा ठाकरे तर विमेंस कॉलेज मधील डॉक्टर अमिता रघटाटे, डॉ. श्रद्धा जैन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालन ग्रंथपाल सारिका पाटील व डॉ. विजया राऊत यांनी तर आभार डॉ. प्रशांत खडतकर यांनी मानले.



Scanned with CamScanner

महाराष्ट्र टाइम्स
नागपूर । रविवार, २४ एप्रिल २०२२ । ४




# विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेवर मार्गदर्शन

नागपूर : श्री निकेतन ऑर्ट्स, कॉमर्स कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्रीबाला देशपांडे होत्या. वक्ता म्हणून 'संकल्प' या स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक योगेश्वर पिकलमुंडे व डॉ. प्रवीण जाधव उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या परीक्षेसोबतच भावी यशस्वी जीवनाचा मार्ग स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निश्चित केला पाहिजे, असे सांगत दोन्ही वक्त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणादरम्यान महाविद्यालयाच्या प्राचार्य देशपांडे यांनी मनाचा निर्धार, अभ्यास करण्याची सवय, जिद्द आणि अथक परीश्रमाच्या जोरावर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक राजेश कनिरे यांनी केले. आभार मराठी विभागप्रमुख मुरलीधर गवळी यांनी मानले. यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारीवर्ग यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दैनिक भास्कर
नागपुर . बुधवार, 15 सितंबर 2021 18

# हिंदी महानतम भाषा : मालोकर



श्री निकेतन आर्ट्स कामर्स कालेज के हिंदी विभाग की ओर से हिंदी दिवस पर कार्यक्रम का आयोजन किया गया। कार्यक्रम की अध्यक्षता कार्यकारी प्राचार्य व हिंदी विभाग प्रमुख डा. राजेंद्र मालोकर ने की। डा. मालोकर ने कहा कि हिंदी महानतम भाषा है। संचालन प्रा. मुरलीधर गवली ने किया। आभार डा. प्रशांत खलतकर ने माना। विद्यापीठ गीत डा. मृणालिनी तापस ने प्रस्तुत किया। मुख्य अतिथि के रूप में व्यंग्यकार टीकाराम साहू 'आजाद' उपस्थित थे। उन्होंने कहा कि सभी के प्रयासों से ही हिंदी राष्ट्रभाषा बनेगी। अपना व्यंग्य 'बजट और कविता' का पाठ कर खूब गुदगुदाया। राष्ट्रगीत के साथ कार्यक्रम का समापन हुआ। कार्यक्रम में डा. रेखा गुल्हाने, डा. उज्ज्वला गोंडाणे, डा. भारती गोस्वामी, प्रा. राजेश कनिरे, प्रा. विजय पाठक एवं शिक्षकेत्तर कर्मचारी ग्रंथपाल सारिका पाटील उपस्थित थे।

Scanned with CamScanner

तरुण भारत

२ -मंगळवार, १५ ऑक्टोबर २०१९

# पोस्टर स्पर्धेत बागडे, बन्सोड प्रथम



प्लॅस्टिकबंदी या विषयावर आयोजित पोस्टर स्पर्धेत डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे उमंग बन्सोड आणि वैष्णवी बन्सोड यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषित पटकाविले. मनोहरराव कामडी महाविद्यालयात सामाजिक जनजागृती अभियानांतर्गत आंतर महाविद्यालयीन पोस्टर स्पर्धा नुकतीच पार पडली. स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक सेवादल महाविद्यालय, नंदनवनचे दीपाली सातपैसे व अलिफा शेख यांनी तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्री निकेतन महाविद्यालयाच्या मनीषा बारापात्रे यांनी प्राप्त केले. प्रोत्साहनपर पुरस्कार मनोहरराव कामडी महाविद्यालयाच्या सायली गायकवाड यांना मिळाला. यावेळी प्लॅस्टिक वापर बंद करण्याबाबत उपस्थितांनी प्रतिज्ञा घेतली. यानंतर डॉ. उषा साकुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार प्रा. मीनाक्षी वासणिक यांनी मानले.

मनोहरराव कामडी महाविद्यालय, नागपूर आयोजित
आंतर महाविद्यालयीन पोस्टर स्पर्धा -
विषय - 'प्लास्टीकबंदी'
'तृतीय क्रमांक' पारितोषिक विजेता
महाविद्यालयाची विद्यार्थीनी.
कु. मनिषा इडपाची
बी. ए. भाग 2

Scanned with CamScanner

www.tarunbharat.net
तरुण भारत



# स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास



स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतलाच पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. श्रीबाला देशपांडे यांनी केले. श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालयात रास गरबा कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कला-वाणिज्य तसेच माजी विद्यार्थ्यांनी वेषभूषा परिधान करून रास गरबा कार्यक्रमात सहभाग घेतला. स्पर्धेत अमनखान पठाण, रोशन पाटील, पंकज गडरिया, मंथन वंजारी, रजनी दुधपचारे, सुश्मिता धारगावे, फैज़ल पठाण, मयूरी तिजारे, एकता उके या विद्यार्थ्यांना विजयी घोषित करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सरोदे, डॉ. गुल्हाने यांनी जबाबदारी पार पाडली. संचालन सारिका पाटील यांनी [illegible] डॉ. राजेंद्र मालाकर यांनी केले.

Scanned with CamScanner

लोकसत्ता नागपूर वृत्तान्त

WWW.LOKSATTA.COM

मंगळवार, २४ सप्टेंबर २०१९



# श्री निकेतन महाविद्यालयाची पूरग्रस्तांना मदत





श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. रेखा गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कोल्हापूर, सातारा, सांगली येथील पूरग्रस्तांना मदत करण्यात आली. तसेच नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे पूरग्रस्तांना मदत पाठवण्यात आली. त्यात महाविद्यालयातील सोनूकुमार शर्मा या विद्यार्थ्याची राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत स्वयंसेवक म्हणून निवड करण्यात आली. त्याने प्रत्यक्षात तेथे जाऊन पूरग्रस्तांना मदत केली. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

ed with CamScanner

# छाया-वृत्त

## श्री निकेतनमध्ये गांधी विचार परीक्षा



◆ नागपूर, २६ मार्च

श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालय तुळशीबाग रोड, रेशीमबाग येथे गांधी रीसर्च फाऊंडेशन, जळगावतर्फे आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा २०१८ ग्रंथालय विभागातर्फे घेण्यात आली. यात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. परीक्षेकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रेखा गुल्हाने यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. समन्वयक म्हणून ग्रंथपाल सारिका पाटील, प्रा. गवळी, प्रा. पाठक यांनी सहकार्य केले. परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner





# श्री निकेतनमध्ये सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

नागपूर : रेशीमबागेतील श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि कविवर्य कुसुमाग्रज स्मृतीदिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथप्रदर्शन आयोजिण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रेखा गुल्हाने यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले आणि कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यानंतर ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner

नागपूर । बुधवार, १४ फेब्रुवारी २०१८
२ महाराष्ट्र टाइम्स
नागपूर महानगर

# 'श्री निकेतन' कॉलेजमध्ये स्नेहसंमेलन






**नागपूर :** श्री निकेतन बहुउद्देशीय संस्थेच्या श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. रेखा गुल्हाने यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून विमेन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. नरेंद्र दीक्षित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र बजिवे होते. व्यासपीठावर सचिव श्रीपाद गंधे, कोषाध्यक्ष सुनंदा गंधे, इतर पदाधिकारी होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन केले. सांस्कृतकि कार्यक्रमांचे प्रभारी प्रा. विजय पाठक यांनी प्रास्ताविक केले. प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. बक्षिस वितरण कार्यक्रमाचे संचालन डॉ. साधना मौंदेकर यांनी तर समारोप कार्यक्रमाचे संचालन सारिका पाटील यांनी केले. डॉ. भारती गोस्वामी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. डॉ. मृणालिनी तापस यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी आणि विदयार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner